


# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक ६, शनिवार १६ नोव्हेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# फिरवतो सांगणारांनी एकाच कुटूंबात दोन भाकरी दिल्या !

## ■ सुजित झावरे यांचा शरद पवारांवर थेट हल्लाबोल ■ देसवडे, मांडवे, वडगांव सावताळ, वासुंदे येथे प्रचार सभा

**टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी**

**भाकरी फिरविण्याची नेहमीच भाषा करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी पारनेर-नगर मतदरसंघात भाकरी न फिरविता एकाच घरात दोन भाकरी दिल्याचे सांगत जिल्हा परिषदेचे मा. उपाध्यक्ष सुजित झावरे यांनी शरद पवार यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला.**

पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघात निवडणूकीची रणधुमाळी सुरू झाली असून प्रचार सभांचा जोर वाढला आहे. महायुतीचे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे उमेदवार काशिनाथ दाते यांच्या प्रचारार्थ सुजित झावरे यांनी देसवडे, मांडवेखर्दु, वडगांव सावताळ, वासुंदे येथे प्रचार सभा घेतल्या या प्रचारसभांमधून झावरे यांनी शरद पवार यांच्यावर थेट हल्लाबोल केला.

यावेळी बोलताना झावरे म्हणाले, मला अजितदादांचा शब्द खरा करून दाखवायचा आहे. अजितदादांनी माझया खांद्यावर जबाबदारी टाकली आहे. माझी जबाबदारी तुमची जबाबदारी आहे. माझे सहकारी सांगतात की आपल्यावर अन्याय झाला. अन्याय झाला असेल न्याय कुणी दिला असा सवाल झावरे यांनी केला. जे सांगतात आम्ही भाकरी फिरवतो, त्यांनी फिरवली का भाकरी ? त्यांनी एकाच कुटूंबात दोन भाकरी देउन टाकल्या असे सांगत त्यांनी शरद पवार यांच्या भुमिकेवर जाहिर नाराजी व्यक्त केली.

यावेळी बोलताना झावरे पाटील म्हणाले, पारनेर-नगर मतदारसंघात आपल्याला राष्ट्रवादी काँग्रेसचा आमदार करायचा असून काशिनाथ दाते हे उमेदवार नाही तर सुजित झावरे उमेदवार आहेत असे समजून तुम्ही सर्वांनी घडयाळाला मतदान करावे. सुजित पाटील म्हणाले, आपल्याला दादांचा शब्द खरा करायचा आहे.



■ जिल्हा परिषदेचे मा. उपाध्यक्ष सुजित झावरे यांच्या उपस्थितीमध्ये वासुंद्यासह विविध गावांत काशिनाथ दाते यांच्या प्रचारार्थ जाहिर सभा घेण्यात आल्या.

> **मा. आ. वसंतराव झावरे पाटील यांच्यासमवेत मी २५ वर्षे काम केले आहे. काही तात्विक कारणामुळे मी अलिप्त झालो होतो. आमच्यात मतभेद झाले होते परंतू जे झाले ते झाले. २०२४ च्या विधानसभा निवडणूकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसची उमेदवारी सुजित झावरे पाटील यांनी दाखविलेल्या मोठेपणामुळेच मिळाले असून त्यांनीच माझ्या नावाची शिफारस केली असल्याने वासुंदेकरांनी एकतर्फी मतदान करावे.**
>
> **काशिनाथ दाते**
> **महायुतीचे उमेदवार**

अजितदादांनी आपल्याला पुनर्वसन करण्याचा शब्द दिला आहे.

यावेळी उमेदवार काशिनाथ दाते, राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षा संध्या सोनवणे, जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, भाजपाचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे, मा. जि. प. सदस्य वसंत चेडे, मा सभापती गणेश शेळके, मा. सभापती अरूण ठाणगे, सरपंच मनोज मुंगसे, सरपंच विमल झावरे, उपसरपंच शंकर बर्वे, चेअरमन नारायण झावरे, सरपंच शिवाजी निमसे, वसंतराव दातीर, शरद पाटील, जालिंदर वाबळे, शिवाजी रोकडे आदी यावेळी उपस्थित होते.

# राणी लंके यांच्या प्रचार फेऱ्यांना नगर तालुक्यात प्रतिसाद

## पुष्पवृष्टी, फटाक्यांची आतिषबाजी, वाजत गाजत प्रचार फेरीचे स्वागत



■ महाविकास आघाडीच्या पारनेर-नगर मतदारसंघातील उमेदवार राणी लंके यांच्या प्रचार फेऱ्यांना नगर तालुक्यात मोठा प्रतिसाद मिळत आहे.

**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

**महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी नीलेश लंके यांच्या नगर तालुक्यातील चौथ्या दौऱ्याला मोठा प्रतिसाद मिळत आहे. गुरूवारपासून सुरू करण्यात आलेल्या प्रचार फेऱ्यांचे नागरिकांकडून गावागावामध्ये उत्स्फूर्त स्वागत करण्यात येत आहे. पुष्पवृष्टी, फटाक्यांची आतिषबाजी, पुष्पवृष्टी तसेच वाजत गाजत राणी लंके यांच्या प्रचारफेऱ्यांना प्रतिसाद मिळत आहे.**

राणी लंके यांची उमेदवारी निश्‍चित होण्यापूर्वीच त्यांनी आरोग्य यज्ञाच्या माध्यमातून गावागावांशी संपर्क साधला होता. त्यानंतर बुथ कमिटयांच्या माध्यमातून त्या दुसऱ्यांदा गावांमध्ये पोहचल्या. उमेदवारी निश्‍चित झाल्यानंतर त्यांनी तिसऱ्यांदा घोंगडी बैठकीच्या माध्यमातून नागरीकांशी संवाद साधला. नागरीकांच्या समस्या समजाउन घेत त्याची नोंद घेऊन त्या समस्या दुर करण्याची ग्वाही दिली. ज्या समस्या तात्काळ माग लावणे शक्य होते त्या माग लावण्यात आल्या.

घोंगडी बैठकांच्या माध्यमातून थेट मतदारांपर्यंत पोहचल्यानंतर आता चौथ्यांदा राणी लंके या प्रचार फेऱ्यांच्या माध्यमातून मतदारांना सामोऱ्या जात आहेत. गुरूवारी त्यांनी नगर तालुक्यातील निमगांव वाघ येथून सकाळी प्रचार फेरीस प्रारंभ केला. निमगांव वाघामध्ये त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. त्यानंतर नेप्ती, निंबळक, नव नागापुर, वडगांव गुप्ता, शिंगवे नाईक , इस्मालपुर, देहरे, नांदगांव या गावांना भेटी देत नागरीकांशी संवाद साधला.

शुक्रवारी सकाळी कामरगांव येथून प्रचार फेरीस सुरूवात करण्यात आली. त्यानंतर चास, अकोळनेर, अरणगांव, वाकोडी, देउळगांवसिध्दी, घोसपुरी, सारोळा कासार या गावांमध्ये प्रचार फेऱ्यांच्या माध्यमातून राणी लंके व त्यांच्या समवेतच्या महिलांनी मतदारांशी संवाद साधला.

> ### मतदारांच्या प्रेमाने भारावले
> **गेल्या दोन दिवसांपासून माझ्यासह माझ्या सहकारी भगिनी नगर तालुक्यातील गावांमध्ये प्रचार फेऱ्यांच्या माध्यमातून मतदारांना सामोरे जात आहोत. या प्रचार फेऱ्यांच्या निमित्ताने आम्ही चौथ्यांदा नागरीकांशी संवाद साधत आहोत. गावागावांमध्ये आम्हाला मोठा प्रतिसाद मिळत असून नागरीकांकडून प्रेम मिळत आहे. त्यांच्या या प्रेमामुळे मी भाराऊन गेले आहे.**
>
> **राणी लंके**
> **महाविकास आघाडीच्या उमेदवार**

> ### लंके परिवाराच्या योगदानाचे फलित
> **खा. नीलेश लंके हे २४ तास ३६५ दिवस नागरीकांसाठी उपलब्ध असतात. त्यांच्या पश्चात आमचे संपूर्ण कुटूंब मतदार संघातील नागरीकांच्या सुख, दुःखात सहभागी होण्यासाठी तत्पर असते. जीवा भावाची माणसं हीच लंके परिवाराची खरी संपत्ती आहे. मतदारसंघात आम्हाला जो प्रचंड प्रतिसाद मिळतो आहे तो खा. नीलेश लंके यांच्या माध्यमातून आमच्या परिवाराने दिलेल्या योगदानाचे हे फलित आहे.**
>
> **राणी लंके, उमेदवार**

> ### नगरच्या लेकीचे कोडकौतुक !
> **मतदारसंघातील नगर तालुक्यातील अरणगांवचे माहेर असलेल्या राणी लंके या विधानसभेच्या रिंगणात उतरल्या असून त्यांना संपूर्ण मतदारसंघात मोठा प्रतिसाद मिळत आहे. त्यांच्या विजयाची औपचारीकातच शिल्लक आहे.नगरची लेक विधानसभेत गरजणार आहे, त्याचे नगरकरांना कोडकौतुक आहे.**

# काशिनाथ दाते यांच्या बालेकिल्ल्यालाच खिंडार!

## सरपंच प्रकाश गाजरे यांचा घणाघाती आरोप

**पोखरी : प्रतिनिधी**



**काशिनाथ दाते यांचे होमग्राऊंड असलेल्या पोखरीचे सरपंच सतीश पवार, वारणवाडीचे सरपंच संजय काशिद यांनी खा .नीलेश लंके यांच्या उपस्थितीमध्ये पोखरीमध्येच राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. म्हसोबा झापचा सरपंच मीच असल्याने महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांच्या बालेकिल्ल्यालाच खिंडार पडल्याचे म्हसोबा झापचे सरपंच प्रकाश गाजरे यांनी सांगितले.**

गाजरे म्हणाले, ज्या टाकळी ढोकेश्वर गटाचे दाते हे नेतृत्व करत आहेत त्या गटामध्ये आज काय राजकीय परिस्थिती आहे ? गटातील एकूण २२ ग्रामपंचायतीपैकी १७ ग्रामपंचायतीचे सरपंच पोखरीमध्ये पार पडलेल्या टाकळी ढोकेश्वर गटाच्या प्रचार सभेस उपस्थित होते. प्रचारसभेची गद पाहिली तरी टाकळी ढोकेश्वर आता कोणाचा बालेकिल्ला आहे याची प्रचिती येते. अलिकडेच पार पडलेल्या उर्वरीत पान ३ वर

> ### लंके यांचे शिलेदार सज्ज
> **लोकसभा निवडणूकीमध्ये खा. नीलेश लंके यांचे जीवाभावाचे सहकारी लोकसभा मतदासंघातील विविध तालुक्यांमध्ये महिनाभरापासून ठाण मांडून होते. त्यामुळे गावागावांमध्ये त्यांचे दुर्लक्ष झाले. आता मात्र लंके यांचे शिलेदार आपल्या गावाची तटबंदी राखण्यासाठी सज्ज असून राणी लंके या मतदासंघातील जिल्हा परिषदेच्या सर्व गटांमध्ये मोठे मताधिक्य घेऊन विक्रमी मतांनी विजयी होतील.**
>
> **प्रकाश गाजरे**
> **सरपंच, म्हसोबा झाप**

> ### दहा हजारांची आघाडी देणार
> **टाकळी ढोकेश्वर गटामध्ये कोटयावधी रूपायांची विकास कामे राबविणाऱ्या खा. नीलेश लंके यांनी गेल्या पाच वर्षात नागरीकांसाठी वैयक्तीक लाभाच्या योजनाही राबविल्या आहेत. मतदारसंघातील प्रत्येक नागरीकांचा खा. लंके यांच्याशी थेट संपर्क असल्याने नागरीकांना लंके कुटूंब आपलेसे वाटते. त्यामुळेच गेल्या पाच वर्षांपासून टाकळी ढोकेश्वर गट लंके यांच्या पाठीशी खंबीर उभे आहे. त्याच बळावर हा गट राणी लंके यांना १० हजार मतांची आघाडी देणार आहे.**

# हिंगोलीत अमित शहांच्या सामानाची तपासणी

## ■ अधिकाऱ्यांनी बॅगा उघडून पाहिल्या ■ आमचा निष्पक्ष निवडणुकांवर विश्वास : शहा

**हिंगोली : प्रतिनिधी**

**केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हेलिकॉप्टरची शुक्रवारी दुपारी महाराष्ट्रातील हिंगोली येथे तपासणी करण्यात आली. निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी शहा यांच्या हेलिकॉप्टरची पाहणी केली आणि त्यात ठेवलेल्या वस्तूही उघडल्या. या संपूर्ण तपासणीची व्हिडिओग्राफीही करण्यात आली. शहा यांनी या घटनेचा एक व्हिडिओ वर पोस्ट केला.**

आपल्या पोस्टमध्ये अमित शहा म्हणाले, आज महाराष्ट्रातील हिंगोली विधानसभा मतदारसंघातील निवडणूक प्रचारावेळी निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी



माझे हेलिकॉप्टर तपासले. भाजपचा निष्पक्ष निवडणूक आणि निरोगी निवडणूक व्यवस्थेवर विश्वास आहे. आम्ही माननीय निवडणूक आयोगाने केलेल्या सर्व नियमांचे पालन करतो.

निवडणुकीत देशातील ९ बड्या नेत्यांची तपासणी

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत निवडणूक आयोगाने कठोर भूमिका घेतली आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने देशातील ९ मोठ्या नेत्यांच्या सामानाची तपासणी केली आहे. आयोगाने १४ नोव्हेंबर रोजी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, उर्वरीत पान ३ वर

# शरद पवारांची पुन्हा भर पावसात सभा !

## ■ पावसाच्या सभेत बोलल्यामुळे निकाल चांगला लागतो ■ इचलकरंजीच्या सभेत पवारांचा मिश्किल दावा

**इचलकरंजी : प्रतिनिधी**

**राज्यात सध्या निवडणुकीचं वातावरण आहे. यातच राजकीय सभांचा धुरळा उडला आहे. शरद पवारांची आज (शुक्रवारी) इचलकरंजी येथे जाहीर सभा होती. मात्र या सभेवेळी पाऊस सुरू झाला तेव्हा महाराष्ट्राचं भवितव्य ठरवणारी ही निवडणूक आहे. माझा, जाहीर सभेचा आणि पावसाचा काही संबंध नाही. परंतु पावसाच्या सभेत मी बोलल्यामुळे निकाल चांगला लागेल असा विश्वास शरद पवारांनी व्यक्त केला.**

इचलकरंजी येथील सभेत शरद




पवार म्हणाले की,महाराष्ट्रात मी सभेला बोलायला उभा राहिलो तर की पावसाची सुरुवात होते. त्यात मी बोलल्यानंतर निवडणुकीचा निकाल हा चांगला लागतो. मध्यंतरी देशाच्या लोकसभेची उर्वरीत पान ३ वर



# युवा

# घरच्यांनी ठरवलेल्या जोडीदाराचा असा ओळखा स्वभाव!

**बऱ्याच लोकांचा आजही असाच समज आहे की अरेंज्ड मॅरेज्डचे दुसरे नाव तडजोड आहे. कारण नातं योग्य दिशेने पुढे नेण्यासाठी आणि वैवाहिक जीवन सुखी बनविण्यासाठी आपल्याला लहान लहान आनंदाचा त्याग करावा लागतो. पण प्रत्येक अरेंज्ड मॅरेज्ड लग्नाचा सिक्वेन्स समानच असेल असे मुळीच नाही. लव्ह मॅरेजप्रमाणेच अरेंज्ड मॅरेज्ड देखील सुंदर बनवता येतात. पण तेव्हाच जेव्हा नवरा-बायको दोघेही नात्यात समजूतदारपणे वागतील. वैवाहिक जीवनात पती-पत्नीने एकमेकांना समजून घेणेच आवश्यक नसते तर नात्यात प्रेम, रोमांस आणि जिव्हाळा टिकवून ठेवण्यासाठी थोडी अतिरिक्त मेहनत देखील घ्यावी लागते.**

## नात्याची सुरुवात करा मैत्रीने...

लग्नानंतर लगेचच, आपल्या जोडीदाराकडे छोट्या छोट्या गोष्टींसाठी आग्रह धरणे किंवा त्यावर हक्क सांगणे योग्य नाही. याचे कारण असे आहे की लग्नाच्या सुरुवातीच्या काही महिन्यात तुम्ही त्यांच्यावर किती प्रेम आहे हे दाखवण्याचा प्रयत्न करत असता. त्यामुळे लग्नानंतर लगेचच असे केल्याने तुमची प्रतिमा त्यांच्या नजरेत खराब होऊ शकते. आपल्याला माहित आहे की प्रत्येक जोडपं वैवाहिक जीवनात आपले १०० टक्के देण्याचा प्रयत्न करतं. पण गैरसमजाचा कोणताही इलाज नसतो. लग्नानंतर नात्यात अचानक प्रेम वाढण्याची तुम्ही अपेक्षा केली तर यामुळे केवळ तुम्हाला वेदनाच नाही तर नात्यावर झालेल्या नकारात्मक परिणामांनाही सामोरं जावं लागेल. प्रेम ही अशी गोष्ट आहे जी नात्यात हळूहळू रंग भरते. अशा परिस्थितीत प्रथम आपल्या जोडीदारास जाणून घेण्याचा प्रयत्न करा आणि एकमेकांचे चांगले मित्र व्हा.



## जसं आहे तसा स्वीकार करा

आम्हाला माहीत आहे की तुम्हाला जोडीदाराच्या काही सवयी अजिबात आवडत नसतील, पण याचा अर्थ असा मुळीच नाही की त्याच्या त्या सवयी ताबडतोब बदलण्याचा प्रयत्न करावा. आपल्या जोडीदारास कोणतेही नियम व कायदे न लावता जसं आहे तसं स्वीकारण्याचा प्रयत्न करा. होय, तुम्हाला जोडीदारातील ज्या गोष्टी आवडत नाहीत त्याबद्दल त्यांच्याशी मनमोकळेपणे संवाद साधण्याचा प्रयत्न करा आणि त्यांना सांगा की त्यांच्या या चुकीच्या सवयींमुळे तुम्हाला किती त्रास होत आहे. पण लक्षात ठेवा की त्यांच्याशी संवाद साधताना तुमच्या बोलण्यात प्रेमळपणा व आदर असावा.

## एकत्र वेळ घालवा

जर तुम्हाला खरोखरच आपलं नातं आनंदी बनवायचं असेल तर आपल्या जोडीदारासह जास्तीत जास्त वेळ घालवण्याचा प्रयत्न करा. दिवसभर आपण कितीही व्यस्त असलात तरी दिवसातील एक तरी वेळ असा ठेवा ज्यावेळी फक्त आणि फक्त दोघांमध्ये चर्चा होईल आणि तो वेळ पूर्णपणे तुम्हा दोघांचा असेल. अरेंज्ड मॅरेज्डची कमतरता हीच आहे की लग्नाआधी दोघांना एकमेकांसोबत राहण्यास जास्त वेळ मिळत नाही. अशा परिस्थितीत जर तुम्ही लग्नानंतरही आपल्या नात्याला वेळ देत नसाल तर ते आपलं नातं फुलवण्याच्या जागी बिघडण्यासाठीच कारणीभूत ठरेल.

## प्रामाणिकपणा

अरेंज्ड मॅरेजमध्ये मुलगा- मुलगी एकमेकांना अजिबात ओळखत नसतात. त्यामुळे त्यांना एकमेकांचा भूतकाळ, सवयी, आवडी-निवडी काहीच माहित नसतं. असावेळी शक्य तितकं एकमेकांसोबत प्रामाणिक आणि खरं राहण्याचा प्रयत्न करावा. कितीही कटू सत्य असो पण ते एकमेकांसमोर कबुल करावं. कदाचित आपल्यातील प्रामाणिकपणा आणि खरं सांगण्याचं धैर्य जोडीदाराला इतकं आवडेल की तो त्याच क्षणी तुमच्या प्रेमात पडेल. नातं कोणतंही असो पण प्रामाणिकपणा हा त्या नात्याचा पाया असतो हे कायम लक्षात ठेवा.

## संयम ठेवा


गोष्ट गर्लफ्रेंड- बॉयफ्रेंडची असो किंवा मग नवरा-बायकोची! कोणतेही नाते चालवण्यासाठी दोन लोकांनी एकमेकांशी जोडले जाणे खूप महत्वाचे असते. काही जोडपी लग्नानंतर लगेचच एकमेकांसोबत कम्फर्टेबल फिल करू लागतात. तर बरेच जण त्यासाठी खूप वेळ घेतात. पण या काळात पती-पत्नी दोघांनी संयम व समंजसपणाने वागणे नात्याला लाभदायक ठरू शकते.



# मर्यादा विसरणारे 'सोशो कपल'

**आपल्याकडे एकदा का दिवाळी संपली, की लगीनघाईचे वेध लागतात. लग्न होण्याआधीच्या (प्री वेडिंग) फोटो शूटने याचा प्रारंभ होतो. मग सुरू होते, 'व्हेन्यू'पासून 'मेन्यू'पर्यंत काय काय आणि कसे करायचे, याची चर्चा. लग्न होण्याआधी आणि लग्न झाल्यावर रिसेप्शनपर्यंत कोणकोणते रंग हवेत, येथपासून होऊ घातलेल्या नवरा-बायकोसाठी भन्नाट हॅशटॅग शोधायचा आणि लग्नाचा दिवस येईपर्यंत सोशल मीडियावर दिवस मोजणारा काउंटडाउन टाकायचा, इथपर्यंत हा सोहळा असतो. हे असे सगळे सोपस्कार पार पडले, की प्रत्यक्ष लग्नाच्या दिवशी ठरलेला हॅशटॅग वापरून, काळे गॉगल लावून, तोंडाचा चंबू करून, जमतील तेवढ्या वेड्यावाकड्या माना करीत, क्लिक क्लिक करीत, तिथेच नवीन जोडप्याला टॅग करून सर्व फोटो सोशल मीडियावर २४ तासांची गोष्ट म्हणून टाकायचे! नवीन जोडपेदेखील ज्यांनी ज्यांनी त्यांना स्टोरीमध्ये टॅग केले आहे, त्या सर्वांना हलते-डुलते इमोजी टाकत आभार मानते...**

लग्नाच्या दिलखुलास फोटोंचा खजिना रिकामा होऊ लागला, की त्याची जागा मग '#कपलगोल्स' म्हणत हनिमूनचे फोटो, सूर्यदर्शन ('सन किस्स्ड') म्हणत काढलेले फोटो, समुद्राच्या वाळूवर एकमेकांची नावे गिरवत काढलेले फोटो, 'माय बे' म्हणत काढलेले फोटो, 'माझे ऊन', 'ऊर्जा', 'ताकद', 'चंद्र', 'सूर्य', 'ग्रह', 'तारे' वगैरे म्हणत काढलेले फोटो! अशी न संपणारी यादीच दिसते. रोजचा सकाळचा चहा आम्ही कसा एकत्र प्यायला येथपासून, रात्री आम्ही कशी घरातच 'कॉफी डेट' केली येथपर्यंत दिवसभरात दोघांनी मिळून केलेल्या अनेक गोष्टींचा ऊहापोह विविध पेजवर सर्रास पाहायला मिळतो. आता येथे सोशल मीडियावर कोणी काय टाकावे किंवा काय टाकू नये, हा ज्याचा त्याचा खासगी प्रश्न आहे, हे बरोबर असले, तरी अशा 'कपल पेजेस'ना आदर्श मानत, तसे घडले नाही, तर सरळ आपले पटणे अवघड आहे असा विचार करणाऱ्या 'सोशो कपल'ला (सोशल मीडियावर शो करण्याचा अट्टाहास करणारे) समजवायचे कसे, हा प्रश्न पडतो. सोशल मीडियावर जे दिसते, तसे खऱ्या आयुष्यात करायची इच्छा असणारे आणि तसे केले नाही, तर आपले पुढे पटणारच नाही, असा विचार करणारे जोडपे समोर आले, तर करायचे काय? मुळात हा प्रश्न पडायचे महत्त्वाचे कारण म्हणजे, आपल्या भोवती अखंड फिरणारे सोशल मीडियाचे चक्र. आजकाल जरा काही झाले, की सोशल मीडिया पाहण्याचा छंदच अनेकांना जडला आहे. त्यातील किती गोष्टी मनावर घ्यायच्या आणि किती घ्यायच्या नाहीत, यालादेखील काही मर्यादा आहेत. नेमक्या त्याच मर्यादेचा विसर आजकालच्या या 'सोशो' जोडप्यांना पडत चालला आहे.



## नात्याची खरी गरज कोण समजेन?

लग्न म्हणजे दोन जीवांचे मिलन हे खरे असले, तरी प्रत्येक वेळी कोणत्याही ठिकाणी उभे राहून ते मिलन 'व्हर्च्युअल' जगाला दाखवणे, म्हणजेच ते लग्न यशस्वी झाले, असा फार मोठा गैरसमज आपल्याकडे होऊ लागला आहे. खरे म्हणजे लग्न हे '#लव्ह'च्या मागे दडलेली सहनशीलता, समजूतदारपणा, विनाशर्त सोबत यांचा खरा '#बाँड' आहे. त्याने /तिने मला अमुक फोटोमध्ये टॅग केले नाही, यापलीकडे जाऊन, आज समाजाने माझ्या जोडीदाराला काही चुकीचा टॅग दिला, तरी तुझे खरेपण मी जाणतो/जाणते आणि म्हणूनच कोणी काहीही म्हणले, तरी मी कायम तुझ्याच सोबत असेन, हा विश्वास दाखवणे हे टॅग करण्यापेक्षा जास्त महत्त्वाचे आहे. कधी एखाद्या हायफाय ठिकाणी जाऊन, एकमेकांबरोबर कसे खूश आहोत, हे दर्शवणाऱ्या फोटोंचा पाऊस पाडणे, ही एक वेळ चैन, मजा असू शकते; पण उद्या एखादे संकट आल्यास आपण दोघे मिळून त्याचा सामना करू, ही कोणतीही पूर्वअट नसलेली सोबत देणे, ही या नात्याची खरी गरज आहे. प्रत्येक वेळी सोशल मीडियावर इतर जोडपी करतात, म्हणून आपणही तसेच केले पाहिजे आणि जोडीदार तसे करीत नसेल, तर त्यांच्याशी वाद घालणे कितपत योग्य आहे? इतर जोडप्यांचे '#व्हेकेशनमोडऑन'वाले फोटो पाहून, आपण दोघांनी वर्षभरात एकदाही परदेशवारी केली नाही, याचा संबंध आपल्या नात्यात काही तरी बिनसले आहे असा लावणे, हे तरी पटण्यासारखे आहे का? त्याला नृत्य अजिबात आवडत नाही, हे माहीत असूनही बळजबरीने ट्रेंडिंग गाण्यावर रील करायला लावणे किंवा आपल्या 'डिनर डेट'चे कोणाला तरी शूट करायला सांगून, तिला आवडत नसताना त्यांचा व्हिडिओ पोस्ट करणे, यांत कोणती '#कपलगोल्स' आपण सिद्ध करतो, याचा विचार एकदा तरी केला आहे का?



## नात्यात उत्तम संवाद हवा


आपण सोशल मीडियावर सतत एकमेकांबद्दल भरभरून लिहिले, आपले कपल फोटो शेअर केले, हातातली कामे सोडून रोज नवीन रील टाकले, म्हणजेच आपण उत्तम जोडपे आहोत, असे खरोखर समजू नये. आपण दोघे सोशल मीडियावर सतत सक्रिय असतो, म्हणजे आपली जोडी 'परफेक्टच' आहे, असा अर्थ तर अजिबातच काढू नये. याउलट आपल्या अतिशय व्यग्र वेळापत्रकातून रोज रात्री एकमेकांसाठी किमान पाच मिनिटे वेळ दिला, तरी त्या नात्यात उत्तम संवाद घडायला हातभार लागेल. त्याचसोबत कधी वेळेच्या, तर कधी पैशांच्या अभावी परदेश, समुद्रकिनारा, डोंगर-दऱ्या नाही पाहता आले, तरी आपल्या बजेटमध्ये जमेल तिथे जाता येते आणि तसे झाल्यास आपण जोडपे म्हणून कुठेही कमी पडलेले नसतो. ठिकाण महत्त्वाचे नसून, सोबत महत्त्वाची असते, हे समजून घ्यायला हवे. यांसारख्या प्रसंगांमध्ये नवरा-बायको दोघेही सोशल मीडिया प्रेमी असतील, तर प्रश्न नाही; कारण त्यांचा आनंदच त्यात असतो.

## एकाला आवडत नसेल तर...

दोघांपैकी कोणतीही एक व्यक्ती सोशल मीडियापासून चार हात लांबच थांबणे पसंत करीत असेल, तर आपला अट्टाहास म्हणून त्याला अथवा तिला सोशल मीडियावर सक्रिय होण्याचा आग्रह धरणेही गैर. असे सतत केल्याने जोडीदार मनाने दुरावू शकतो, ही गोष्ट लक्षात घ्यायला हवी. भले आम्ही समोर आल्यावर एकमेकांशी बोलत नसलो, तरी सोशल मीडियावर एकमेकांच्या फोटोंना अगदी न विसरता लाइक करतो, प्रतिक्रिया देतो, अशा दिखाऊ दुनियेत रमून, आपले नाते कसे प्लॅटिनमसारखे चकाकते आहे, हे जगाला दाखवण्यापेक्षा, एकमेकांशी मोकळेपणाने प्रत्यक्षात संवाद साधून, एकमेकांच्या मतांचा, मूल्यांचा आदर करीत, आवड-नावड लक्षात घेत, त्या नात्याला पुरेसा वेळ कसा देता येईल, हा विचार अधिक करायला हवा. केवळ झगमगत्या सोशल मीडियासाठी नाही, तर एकमेकांशी कायम प्रामाणिक राहणारे नाते अधिक भक्कम आणि चिरकाल टिकणारे असते.



# तो तुम्हाला इग्नोर का करतोय?



तो कधीच मला पहिला मेसेज करत नाही किंवा स्वतःहून पहिला संवाद सुरू करत नाही पण मी जेव्हा बोलायला सुरुवात करते तेव्हा मात्र अगदी वेळेवर त्याचे रिप्लाय येऊ लागतात असं का? तुमच्याही मनात अशा प्रश्नांनी गोंधळ निर्माण केला असेल तर जास्त चिंता करण्याची गरज नाही. असं यासाठी कारण आजच्या अनेक महिला या परिस्थितीचा सामना करत आहेत. एका नात्यात असताना संवाद ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची असते. पण कधी कधी कम्युनिकेशन गॅपमुळे काही नाती अगदी योग्य रुळावर चालत असताना अचानक तुटण्याच्या मार्गावर जातात. याचं मुख्य कारण म्हणजे बहुतांश मुलींना वाटतं की, आपला जोडीदार कोणा दुसऱ्या कोणत्यातरी महिलेशी चॅटिंग करतो आहे. आजचा काळ मेसेजवर नातं जिवंत ठेवण्याचा असला तरी काही लोकांना अशा पद्धतीने नातं पुढे घेऊन जायला आवडत नाही. अशा लोकांना मेसेजपेक्षा कॉलवर बोलणं जास्त सोयीस्कर वाटतं, त्यामुळे ही लोक मेसेज करण्याचं कष्टच घेत नाहीत. असं करण्यामागे त्यांचा एगो व लाजवीट स्वभावही कारणीभूत असू शकतो. तरीही महिलांपेक्षा पुरुषांचं मन समजणं सोपं आहे. हेच नाही तर अशी अनेक कारणं आहेत जी सिद्ध करतात की, तुम्हाला ते इग्नोर करत नसून त्यामागे काही वेगळीच कारणं आहेत...

- लाजवीटपणा : जर तुमचा होणारा जोडीदार किंवा बॉयफ्रेंड तुम्हाला लगेच किंवा वेळेवर मेसेजचं उत्तर देत नसेल तर याचा अर्थ असा मुळीच नाही की, तो दुस-या कोणत्यातरी मुलीकडे आकर्षित झाला आहे व तिच्याशी चॅटिंग करतो आहे. तर त्याचं असं करण्याचं कारण लाजवीटपणा देखील असू शकतो. हो, हे तुम्हाला ऐकायला थोडं विचित्र वाटत असेल पण बहुतांश मुलांची किंवा पुरुषांची सत्यता हीच आहे की, ते आपल्या मित्रमंडळींसोबतही मनमोकळेपणे संवाद साधत नाहीत. ज्यामुळे त्यांना नेहमीच प्रत्येक नात्यात समस्यांचा सामना करावा लागतो.
- भावनांचा खेळ होण्याची भीती : असं होऊ शकतं की, तुमच्या होणा-या जोडीदाराला आधीच एका ब्रेकअपला किंवा प्रेमभंगाला सामोरं जावं लागलं असेल ज्यामुळे नवं नातं सुरु करण्यासाठी तो वेळ घेत असेल. अशावेळी जोडीदारावर संशय घेण्यापेक्षा किंवा जासूसी करण्यापेक्षा त्याला समजून घेणं गरजेचं असतं. शिवाय यामागील कारण समजून घ्या की, तुम्ही आवडत असताना, नातं हवं असतानाही तो पुढचा प्रवास सुरू करण्यासाठी इतका वेळ का घेत आहे? जर त्याच्या मनात प्रेमभंगाची भीती असेल तर ती काढून टाकणं तुमची जबाबदारी आहे.
- व्यस्त जीवनशैली : यात काहीच शंका नाही की पुरुष महिलांसारखे मल्टिटास्किंगमध्ये पारंगत नसतात. ते नेहमीच घर व काम यातील ताळमेळ साधण्यात कच्चे असतात. ज्यामुळे त्यांची पर्सनल लाइफ खराब होते. पण महिलांचं उलट असतं. त्या घरासोबतच ऑफिसमध्येही फ्रंट लाइनवर असतात आणि त्याचा परिणाम कुठेच त्या पर्सनल लाइफवर होऊ देत नाहीत. त्या आपली जबाबदारी चोख पार पाडतात. त्यामुळे जर तुमचा जोडीदार कॉल किंवा मेसेजवर तुम्हाला वेळ देत नसेल तर आधी त्याची लाइफस्टाइल समजून घेण्याचा प्रयत्न करा की, तो नक्की इतका व्यस्त का आहे?
- मनमोकळेपणे संवाद : ही खूप लोकांची समस्या असते की ते जितका संवाद फोनवर साधू शकतात त्याच्या अर्ध देखील ते मेसेजवर बोलू शकत नाहीत. अशी लोक फोनवर तासनतास कोणताही कंटाळा न करता बोलू शकतात पण मेसेजवर बोलण्याची वेळ आली की नाकं मुरडतात. जर तुमचा जोडीदारही असंच करत असेल तर त्याच्याशी मनमोकळेपणे संवाद साधा. त्याचं तुमच्यावर खरं प्रेम असेल तर फोन काय किंवा मेसेज काय.. तो कोणत्या ना कोणत्या मार्गाने तुमच्याशी संवाद साधणारच!
- मेसेजमुळे गैरसमज : अनेक पुरुष प्रॅक्टिकल असतात त्यामुळे भावनेत अडकणं त्यांना जमत नाही. कधी कधी होतं असं की ते थेट काहीतरी मेसेज करतात ज्याचा अर्थ नीट न समजल्याने समोरचा माणूस दुखावतो, रागावतो, चिडतो. त्या व्यक्तीला नक्की काय झालं हे देखील या पठ्ठ्यांना समजत नाही, कारण त्यांच्या मते त्यांनी योग्य मेसेज केलेला असतो. अशावेळी एका अनुभवानंतर ते मेसेजवर बोलणं टाळतात कारण मेसेजवर गैरसमज होतात असं त्यांचं मत असतं. काही अंशी हे योग्य देखील आहे. कारण मेसेजवर माणसाच्या भावना समजत नाही त्यामुळे तो संवाद हृदयाला भिडत नाही. म्हणून कोणताही अंदाज बांधून नातं तोडण्याआधी वरील गोष्टींची शहानिशा नक्की करून घ्या.

## हाताच्या बोटांवरून ठरवा तुमची परफेक्ट मॅच

**लग्न हा एक प्रकारचा जुगार आहे असं म्हटलं जातं. कारण अरेंज मॅरेजमध्ये मुला- मुलींचे स्वभाव लग्नाआधी कळत नाहीत आणि लव्ह मॅरेजमध्ये स्वभाव माहीत असूनही लग्नानंतर वेगळेच अनुभव येऊ शकतात. तरीही समुद्रशास्त्रात सांगितल्यानुसार तुम्ही बोटांवरून स्वभाव ओळखू शकता. हाताची बोटं व्यक्तीचा स्वभाव दर्शवितात, असं सांगण्यात येते. मुलामुलींचा स्वभाव ओळखण्यासाठी कशी बोटं असावी जाणून घ्या...**

- लांबसडक अन् पातळ बोटे : ज्या मुलींची वा मुलांची बोटं लांबसडक आणि पातळ आहेत त्या व्यक्ती अत्यंत क्रिएटिव्ह असतात आणि कधीही समोरच्या व्यक्तीकडून जास्त अपेक्षा करत नाहीत. त्यामुळे संसार करताना या व्यक्तींची जास्त भांडणं होत नाही. गर्लफ्रेंड, पत्नी, मित्रमैत्रिण अथवा कोणतेही नाते निभाविण्यामध्ये या व्यक्ती उत्तम ठरतात. यांचे व्यक्तीमत्व आकर्षक असून सर्वांना आपलेसे करणारी ही माणसं असतात असे सांगण्यात येते.
- जाडसर अन् लहान बोटे : ज्या व्यक्तींची बोटं जाडसर आणि लहान असतात, त्या आपल्या आयुष्यात अत्यंत मस्त आणि खुश असतात. मनाने अत्यंत साफ असून कोणतेही कपट मनात ठेवत नाहीत. तसंच सर्वांना आनंदी ठेवण्याचा प्रयत्न या व्यक्ती करतात. मात्र अशा व्यक्ती कमी जबाबदार असतात. अंगावर कोणतीही जबाबदारी घेणं अशा व्यक्तींना आवडत नाही असं सांगण्यात येते.
- जाडसर अन् भरलेली बोटं : ज्या व्यक्तींची बोटं ही जाडसर आणि भरलेली असतात अशा व्यक्ती नात्यांच्या बाबतीत अत्यंत गंभीर आणि जबाबदार असतात. मात्र अशा व्यक्तींकडे पैसा टिकत नाही आणि बचत करणे या व्यक्तींना जमत नाही आणि या व्यक्तींचा स्वभाव अधिक खर्चिक असल्याचेही दिसून येते. त्यामुळे अशी बोटं असणाऱ्या व्यक्ती मनाने जरी चांगल्या असल्या तरीही खर्चाच्या बाबतीत फारच पुढे असतात.
- लहान अन् पातळ बोटं : लहान आणि पातळ बोटं असणाऱ्या व्यक्तींना लवकर राग येतो आणि आलेला राग लवकर शांतही होत नाही. तसंच या व्यक्ती अत्यंत कंजूसदेखील असतात.

पारनेर दर्शन
शनिवार १६ नोव्हेंबर २०२४


## शॉर्ट न्यूज

### कोपरगावकर आ.आशुतोष काळेंच्या पाठीशी

■ **कोपरगाव :** मतदार संघाच्या विकासाला दिशा देवून कोपरगाव शहराचा पाणी प्रश्न सोडविला आहे. त्यामुळे महिला भगिनींच्या डोक्यावरचा हंडा कायमचा उतरविला हे कोपरगाव शहरातील महिला भगिनींच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची गोष्ट आहे. त्यामुळे कोपरगाव शहरातील आम्ही संपूर्ण नरोडे परिवार आ. आशुतोष काळे यांच्या पाठीशी उभे असून आमचा त्यांना खंबीर पाठींबा असल्याचे मनोज नरोडे यांनी सांगितले. कोपरगाव शहरात नरोडे पाटील परिवार एक मोठा परिवार आहे.

### नेवासा विधानसभा मतदारसंघात तिरंगी लढत

■ **नेवासा :** विधानसभा मतदारसंघात गत निवडणुकीत क्रांतिकारी शेतकरी पक्षाचे शंकरराव गडाख यांनी भाजपच्या बाळासाहेब मुरकुटे यांचा ३०६६३ मतांनी पराभव केला होता. यंदाच्या निवडणुकीत महाविकास आघाडीकडून शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे शंकरराव गडाख, महायुतीकडून शिवसेना शिंदे गटाचे विठ्ठलराव लंघे आणि प्रहार जनशक्ती पक्षाचे बाळासाहेब मुरकुटे यांच्यात तिरंगी लढत असणार आहे. त्यांच्यासह वंचित बहुजन आघाडीचे पोपट सरोदे, बसपाचे हरिभाऊ बहिरु चक्रनारायण हेदेखील निडणुकीच्या मैदानात आहेत. मुरकुटे यांच्या उमेदवारीचा सर्वाधिक फटका विठ्ठलराव लंघे यांना बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### शिर्डी नॉलेज सिटी करण्यात खोडा घातला

■ **शिर्डी :** शिर्डीत जगभरातील लोक येतात. शिर्डी नॉलेज व आयटी सिटी बनविण्याचा प्रस्ताव आपण शिर्डीच्या विश्वस्त मंडळासमोर मांडला होता. पण काही लोकांना आपले कॉलेजेस बंद पडतील असे वाटले म्हणून यात खोडा घातला गेला, अशी टीका राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केली. काँग्रेसच्या उमेदवार प्रभावती घोगरे यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत ते बोलत होते. यावेळी बाळासाहेब थोरात, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, डॉ. सुधीर तांबे, राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके आदी उपस्थित होते. पवार म्हणाले, मी या भागात शिकायला होतो.

### आ.राजळेंनी ऊस दराबाबतचा शब्द पाळला

■ **शेवगाव :** आमदार मोनिका राजळे यांनी ऊसदराबाबत शेतकऱ्यांना दिलेला शब्द पाळला. त्यामुळे त्यांचा शेतकऱ्यांच्या वतीने सत्कार केला. त्यांनी पैठण ते तिसगाव रस्त्यासाठी २१५ कोटींचा निधी उपलब्ध करून आणला. घोटणसारख्या गावात तब्बल दहा कोटी रुपयांची विकासकामे केली, त्या-ज्या बोलतात ते करतात त्यामुळे, या परिसरातील नव्हे तर तालुक्यातील शेतकरी त्यांच्या मागे ठाम उभा राहील, असा विश्वास शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष अशोक भोसले मेजर यांनी व्यक्त केला.

### प्रेमामुळे नवव्यांदा विधानसभेत कामाची संधी

■ **संगमनेर :** तालुक्यातील जनतेचे प्रेम आणि त्यांचा असलेला विश्वास यामुळे सलग नवव्यांदा विधानसभेत काम करण्याची संधी मिळत आहे, राज्य पातळीवर आणि राष्ट्रीय पातळीवर मोठी संधी मिळाली, तिचा उपयोग संगमनेर तालुक्याच्या विकासासाठी केला, संगमनेरकर नागरिकांचा सन्मान वाढेल, असेच राज्यात काम केल्याने चंद्रपूर ते पालघर कुठेही गेले तरी संगमनेरचा आदर केला जातो, असे मत संगमनेर विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार, आमदार बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केले.

# उमेदवारांनी साधली बाजारांची पर्वणी!



**पाथर्डी : प्रतिनिधी**

**विधानसभा निवडणुकीनिमित्त आठवडे बाजाराची पर्वणी साधत शेवगाव-पाथर्डी मतदारसंघातील प्रमुख उमेदवार व त्यांच्या समर्थकांनी बुधवारी पाथर्डी शहर व बाजार परिसर पिंजून काढला. वाहनांचा गोंगाट, वाहतूक कोंडीमुळे खऱ्या अर्थाने वातावरण निवडणूकमय झाले होते.**

शेवगाव-पाथर्डी मतदारसंघात आमदार मोनिका राजळे, माजी आमदार चंद्रशेखर घुले, राष्ट्रवादीचे शरद पवार गटाचे नेते प्रताप ढाकणे, वंचित बहुजन आघाडीचे प्रा. किसन चव्हाण, अपक्ष उमेदवार हर्षदा काकडे या उमेदवारांमध्ये प्रमुख लढत होत आहे. या सर्वच उमेदवारांच्या समर्थकांनी बुधवारी आठवडे बाजाराची पर्वणी साधली. जनावरांच्या बाजार, दैनंदिन बाजार, बाजारपेठ, शहरातील विविध उपनगरांमधून शक्तिप्रदर्शन करीत प्रचार फेऱ्या काढल्या. हर्षदा काकडे यांच्या रिक्षांची प्रचारफेरी चर्चेचा विषय ठरली. कोरडगाव चौकामध्ये वंचित आघाडी व अपक्ष उमेदवार चंद्रशेखर घुले यांच्या गटातर्फे जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष राजश्री घुले या दोन्ही प्रचार फेऱ्यांचा सामना झाला. त्यामुळे रस्त्याच्या दुतर्फा काही काळ वाहतूक कोंडी झाली होती.

पुढच्या बुधवारी मतदान असल्याने प्रचाराच्या दृष्टीने शेवटचा आठवडे बाजार उमेदवार व त्यांच्या प्रचारकांसाठी लाभला. चहा, पाणी, जेवण व मानधन असा प्रचारकांचा एकूण साच्या असल्याचे सांगितले जात असले, तरी एकही प्रचारक या मोबदल्यात किती पैसे दिले जातात, याची वाच्यता करीत नाही. त्यामुळे आचारसंहिता कक्षाकडे कोणाला तक्रारी करता येत नाही. सर्वच प्रमुख नेत्यांना अशा यंत्रणेची गरज असल्याने तक्रारी करण्याच्या भानगडीत सहसा कोणी पडत नाही. मात्र, त्याच त्याच प्रचारकांना आलटून पालटून बघण्यात मतदारांची चांगली करमणूक होत आहे. उमेदवारांमध्ये प्रमुख तीन उमेदवार शेवगाव तालुक्यातील, तर दोन उमेदवार पाथर्डी तालुक्यातील आहेत. त्यामुळे आपल्या माणसाकडे बघा, असाही प्रचाराचा सूर राजकीय दिशा धूसर करणारा ठरत आहे.

ग्रामीण भागातही आता प्रचारांचा जोर वाढत असून, प्रचारकांना सुगीचे दिवस आले आहेत. काही फेऱ्यांमध्ये सकाळी दिसणारे प्रचारक सायंकाळच्या प्रचार फेरीत दुसऱ्या उमेदवाराच्या गोटात घोषणा देताना दिसतात. काही प्रचारकांनी तर रोजंदारीवरील काम सोडून प्रचार फेऱ्यांना प्राधान्य दिले आहे.

# अखेर साई मंदिर व परिसरात फुले विक्रीस परवानगी

## विखे पाटील यांच्या माध्यमातून प्रश्नाचा पाठपुरावा । शेतकरी,विक्रेत्यांना मोठा दिलासा

**शिर्डी : प्रतिनिधी**

**२०२३ मध्ये याबाबत साईबाबा विश्वस्त व्यवस्थापन समितीकडून दाखल करण्यात आलेल्या ठरावानुसार तसेच तालुक्यातील फुल उत्पादक शेतकऱ्यांनी दाखल केलेल्या याचिकेवर झालेल्या सुनावणी नंतर श्री.साई मंदिर व परिसरात फुले विक्रीस उच्च न्यायालयाने गुरुवारी परवानगी दिल्याने फुल उत्पादक शेतकरी आणि विक्रेत्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. महसूल मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी केलेल्या पाठपुराव्याचे मोठे यश मानले जात आहे.**

कोव्हीड संकटापासून साई मंदिराम फुले नेण्यास बंदी घालण्यात आली होती. त्यामुळे फुल आणि हार विक्रेत्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहेत. यासाठी शासन स्तरावरही मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि डॉ सुजय विखे पाटील यांच्या माध्यमातून या प्रश्नाचा पाठपुरावा सुरु होता. संस्थानवर कार्यरत असलेल्या त्रिसदस्यीय समितीकडे याबाबतची मागणी करण्यात येत होती. मात्र निर्णय होत नसल्यामुळे फुल उत्पादक शेतकरी अनुक्रमे कचेश्वर चौधरी, अर्जुनराव चौधरी, संदिप गोर्डे यांनी न्यायालयात याचिका दाखल केली होती. तर साईबाबा संस्थानच्या त्रिसदस्यीय समितीने दिनांक १३ एप्रिल २०२३ रोजी ठराव करुन, कर्मचारी पतपेढीच्या माध्यमातून रास्त दरात फुल विक्री करण्याची परवानगी मिळावी असे म्हणणे न्यायालयात मांडले होते.

यापुर्वीही या प्रकरणाची सुनावणी उच्च तसेच सर्वोच्च न्यायालयात झालेली होती. फुल उत्पादक शेतकरी तसेच फुल उत्पादक तसेच विक्रेत्यांच्या मागणीची सामाजिक दृष्टीकोनातून विचार होण्यासाठी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सर्वच स्तरांवर आपला पाठपुरावा सुरुच ठेवला होता. आज संभाजीनगर येथील उच्च न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी होवून न्यायालयाने श्री.साईबाबा मंदिर व परिसरामध्ये फुले विक्रीस परवानगी देण्याचा निर्णय दिल्यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे.या सुनावणी प्रसंगी फुल उत्पादक शेतकऱ्यांच्या वतीने जेष्ठ विधीज्ञ विनायकराव होन, संस्थानच्या वतीने विधीज्ञ बजाज आणि शासनाच्या वतीने विधीज्ञ सुभाष तांबे यांनी बाजू मांडली. दरम्यान या झालेल्या निर्णयाबद्दल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि डॉ सुजय विखे पाटील यांचे फुल उत्पादक शेतकरी आणि विक्रेत्यांनी अभिनंदन करून जल्लोष केला.शिर्डी शहरात फटाक्यांची अतिषबाजी करून या निर्णयाचे स्वागत केले.फुल विक्रेत्यांनी मंत्री विखे यांचे शिर्डी विमानतळावर जल्लोषात स्वागत करून त्यांचे आभार मानले.



### उच्च न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत

**मंदिर आणि परिसरात फुल विक्री बाबत उच्च न्यायालयाने निर्णयाचे आपण स्वागत करीत असून, या निर्णयामुळे तालुक्यातील फुल उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून मागील काही वर्षात फुल उत्पादक शेतक-याचे झालेल्या आर्थिक नकसानीचे गांभिर्य न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले होते. यासाठी करण्यात आलेल्या पाठपुराव्याला यश मिळाले असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.**

# कोपरगावात अवैध दारू वाहतूक करणारे ताब्यात; साडेतीन लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**कोपरगाव : प्रतिनिधी**

**विधानसभेच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाने कंबर कसली आहे. कोपरगाव शहरातून अवैध दारू वाहतूक करणारे दोघे रिक्षासह स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडून तीन लाख ४३ हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. याबाबत कोपरगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

विशाल रमेश पाटील, (वय २३, रा.निघोज निमगाव, ता.राहाता, जि.अहिल्यानगर), गौतम वाल्मिक जगताप, (वय २०, रा.निघोज



निमगाव, ता.राहाता, जि.अहिल्यानगर), असे ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव आहे.


स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांना मिळालेल्या माहितीनुसार विशाल पाटील व त्याचा साथीदार दोघे अॅपे रिक्षातून अवैध दारू विक्री करण्यासाठी घेऊन जात असल्याची खात्रीशिर माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने मिळालेल्या माहितीनुसार सापळा रचून आरोपीस मोठ्या शिताफीने ताब्यात घेतले. याबाबत कोपरगाव पोलीस ठाण्यात दोघांविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई गुन्हेचे पोलीस अंमलदार गणेश भिंगारदे, रणजीत जाधव, विशाल तनपुरे व रमीज राजा आत्तार यांच्या पथकाने केली.

# मतदानासाठी कामगारांना भरपगारी सुट्टी

## राज्य शासनाकडून सार्वजनिक सुट्टी जाहीर

**नगर : प्रतिनिधी**

**विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी जिल्ह्यात सर्व विधानसभा मतदारसंघात बुधवार २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. त्या दिवशी मतदारांना मतदान करता यावे यासाठी राज्य शासनाने सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे.**



विधानसभा निवडणुकीत कामगारांना मतदान करता यावे यासाठी निवडणूक क्षेत्रातील मतदार असलेले कामगार, अधिकारी, कर्मचारी यांना ते कामानिमित्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरीही निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात यावी. ही सुट्टी राज्य शासन, केंद्र शासन व खाजगी कंपन्या या मधील आस्थापना, सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे, नाट्यगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना तसेच माहिती व तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग सेंटर, मॉल्स, रिटेलर्स इ. आस्थापनांना लागू राहील.

अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी-कर्मचारी इत्यादीना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसल्यास मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी केवळ दोन ते तीन तासांची सवलत देता येईल. मात्र त्याबाबत त्यांनी जिल्हाधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील. कोणत्याही परिस्थितीत कामगारांना मतदानासाठी किमान दोन ते तीन तासांची सवलत मिळेल याची दक्षता संबंधित आस्थापना मालकांनी घेणे आवश्यक राहील.

सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींच्या मालकांनी किंवा व्यवस्थापनाने वरील आदेशाचे अनुपालन होईल याची खबरदारी घ्यावी. मतदारांकडून मतदानाकरिता योग्य ती सुट्टी अथवा सवलत प्राप्त न झाल्याने मतदान करता येणे शक्य न झाल्याबाबत तक्रार आल्यास, त्यांच्याविरुद्ध योग्य ती कारवाई करण्यात येईल. याबाबत तक्रार असल्यास सहायक कामगार आयुक्त कार्यालय, मुलजी निवास, डॉ. चोंभे हॉस्पिटल, बालिकाश्रम रोड, सावेडी, अहिल्यानगर (दूरध्वनी क्र. ०२४१-२४५१८५२) येथे करावी, असे आवाहन सहायक कामगार आयुक्त रे.मु.भिसले यांनी केले आहे.

## वाचकांच्या लेखणीतून

# तुला बुरगुंडा होईन!

कीर्तन, भारूड आदी लोककलांच्या नौका भक्तीच्या नदीप्रवाहातूनच वल्हविल्या जातात. समाज प्रबोधनासाठी भक्ती हे एक अवगुंठण असते. बहू रूढ ते भारूड अशी भारूड या शब्दाची व्युत्पत्ती आहे. संत एकनाथांनी मराठीत भारूड हा लोककलेचा प्रकार रूढ केला. मनोरंजनातून समाजप्रबोधन हा भारुडाचा हेतू असतो.



नवरा नको गं बाई मला दादला नको गं बाई, आईचा जोगवा मागीन, बाळ रडता राहीना, सुई घे, पोत घे, तुला बुरगुंडा (ज्ञान) होईन अशी सुंदर सुंदर भारुडे मराठी भाषेत उपलब्ध आहेत.

भारुडे ही गद्य पद्य स्वरुपात सादर केली जातात. त्यात नाट्यही निर्माण होते; त्यामुळे त्यात जिवंतपणाही आढळून येतो. दारू, तंबाखू, गुटखा या व्यसनांपासून दूर रहा. मानवी देह लाख मोलाचा आहे. तो फुकाफुकी मातीमोल करु नका. माया, मोह, लोभ,मत्सरादी आपले षड्रिपू आहेत. त्यांपासून अखंड सावधान राहा. चोरी करणे, खोटे बोलणे, हिंसा करणे पाप आहे. परिणामी आपणास नरकवास भोगावा लागतो. अशा प्रकारचे प्रबोधन भारुडांतून केले जाते.

कीर्तन, तमाशा, भेदिक (कलगी तुरा) यांसारखेच भारूड हेही मराठी लोककलेचे एक प्रभावी अंग आहे. ते आपल्या संस्कृतीचे अनोखे रूप आहे. म्हणून भारूड या लोककलेचे जतन आणि काळानुरूप संवर्धन झाले पाहिजे. तिला शासन आणि जनता जनार्दनाने उदंड आश्रय दिला पाहिजे.

**नाना ढवळे, ८२८६९१३२२३**
**निघोज, ता. पारनेर, जि. अहमदनगर.**

(पान १ वरून)

### काशिनाथ दाते यांच्या बालेकिल्ल्यालाच खिंडार!

लोकसभेच्या निवडणूकीत खा. नीलेश लंके यांनाच आघाडी होती. पाच वर्षापूर्वीच्या विधानसभेलाही नीलेश लंके यांचाच वरचष्मा होता. आता यावेळच्या विधानसभा निवडणूकीतही राणी लंके यांचे मताधिक्य नीलेश लंके यांच्या मागील दोन निवडणूकांपेक्षाही अधिक असणार असल्याचा दावा सरपंच गाजरे यांनी केला.

गाजरे म्हणाले, खा. नीलेश लंके हे २४ तास ३६५ दिवस नागरीकांच्या सुख, दुःखात सहभागी होतात. त्यांचा निवडणूकीपुरताच नव्हे तर संपूर्ण पाच वर्षे मतदारसंघाशी संपर्क असतो. विरोधक मात्र निवडणूकीमध्ये उमेदवारी मिळाल्यानंतर भुत्रासारखे उगवले असून त्यांना मतदारांची साथ कशी मिळेल ? कोरोना संकटात संपूर्ण मतदारासंघाबरोबरच ज्याला कोरोनाची बाधा झाली त्याला खा. नीलेश लंके यांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून जिवदान दिले. कोरोना संकटात आज दारामध्ये मते मागण्यासाठी येणारे उमेदवार कुठे होते ? त्यांनी किती रूग्णांना आधार दिला याचे उत्तर त्यांनी प्रथम द्यावे असे आव्हान गाजरे यांनी दाते यांना दिले आहे.

### हिंगोलीत अमित शहांच्या सामानाची तपासणी

गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि उद्धव ठाकरे यांच्या सामानाची तपासणी करण्यात आली.खरगे निवडणूक प्रचारासाठी नाशिकला पोहोचले होते. त्यांच्या सामानाची हेलिपॅडवर तपासणी करण्यात आली. या घटनेचीही व्हिडिओग्राफीही करण्यात आली. गोंदियात महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांचे हेलिकॉप्टर आणि बॅग तपासण्यात आली.ते गोरेगाव विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादीच्या (एसपी) उमेदवाराच्या प्रचारासाठी जात होते. अहमदनगरमध्ये तिसऱ्यांदा उद्धव ठाकरेंची चौकशी झाली. अशा प्रकारे कराड विमानतळावर (सातारा) गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्या सामानाचीही तपासणी करण्यात आली.

### शरद पवारांची पुन्हा भर पावसात सभा !

निवडणूक झाली. आता विधानसभेची निवडणूक आहे. या निवडणुकीत महाराष्ट्राचा कारभार कुणाच्या हातात द्यायचा याचा निकाल आपल्या सगळ्यांना घ्यायचा आहे. ज्यांच्या हातात आपण महाराष्ट्राची सत्ता दिली त्यांचा ५ वर्षाचा अनुभव बघितला तर सत्तेत बदल केल्याशिवाय आपल्याकडे पर्याय नाही. सत्तेत बदल करायचा असेल महाविकास आघाडीचे उमेदवार मोठ्या संख्येने विजयी करून सरकार बनवण्याचे ऐतिहासिक काम उद्याच्या २० तारखेला तुम्हाला घ्यायचे आहे. भरपावसात तुम्ही याठिकाणी आलात, आमची भूमिका समजून घेण्याची तयारी केली त्याबद्दल तुम्हाला लाख लाख धन्यवाद देतो असे त्यांनी जनतेला सांगितले. पावसामुळे १० मिनिटांत ही सभा उरकण्यात आली.

शरद पवार यांचा पावसात भिजताना भाषण देतानाचा फोटो आजही अनेकांच्या लक्षात आहे. साताऱ्यातील त्या सभेचं सर्वत्र कौतुक झाले. पायाला दुखापत होऊनही पवारांनी दाखवलेल्या जिद्दीचं सोशल मीडियावर कौतुक करण्यात आले. सोशल मीडियात शरद पवारांचा फोटो ट्विटरवर ट्रेंडमध्ये आला. पावसाची संततधार सुरू असूनही शरद पवार भाषण देण्याचे थांबले नव्हते. शरद पवार भर पावसात आणि पायाला दुखापत होऊनही सभा घेत असल्याचं पाहून कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला होता. त्यांच्या प्रत्येक वाक्यावर टाळ्यांचा कडकडाट सुरू होता. तसेच काही इचलकरंजी येथे घडले. सभास्थळी पावसाची रिमझिम सुरू झाली. त्यावेळी पवार भाषणाला उभे राहिले. त्यांनी पाऊस आणि भाषण यांच्या योगायोगावरून विनोदी शैलीत भाष्य केले.

# जिल्ह्यातील बहुतांश उमेदवारांच्या खर्चात तफावत

## उमेदवार आणि प्रतिनिधींची उपस्थिती

**नगर : प्रतिनिधी**

**नगर जिल्ह्यातील विधानसभा उमेदवारांच्या खर्चविषयक पहिल्या तपासणीत बहुतांश उमेदवारांच्या खर्चात तफावत आढळून आली आहे. विधानसभा निवडणुकीत उमेदवारांना प्रचारासाठी ४० लाख रुपये खर्च** करण्याची मर्यादा निवडणूक आयोगाने घालून दिली आहे.

पहिली खर्च तपासणी शनिवारी (ता.९) अकोले, संगमनेर, राहुरी, श्रीरामपूर, कर्जत-जामखेड आणि श्रीगोंदा मतदारसंघातील उमेदवारांची झाली. यावेळी खर्च तपासणीसाठी उमेदवार आणि प्रतिनिधी उपस्थित होते. तर कोपरगाव, शिर्डी, नेवासा, शेवगाव, पारनेर आणि नगर शहर मतदारसंघातील उमेदवारांची खर्च तपासणी रविवारी (ता.१०) झाली.

# मेरे पास भगवानने दिया हुवा सब कुछ है!

## ■ आ. संग्राम जगताप ■ सेवावृत्तीने मातृभुमीसाठी पुर्णवेळ काम करण्याची भूमिका ■ जगताप यांच्या पाठिंब्यासाठी समस्त व्यापारी वर्ग एकवटला




नगर : प्रतिनिधी

**मेरे पास भगवानने दिया हुवा सब कुछ है ! असे सांगत केवळ सेवावृत्तीने आपल्या मातृभुमीसाठी पुर्णवेळ काम करण्याची माझी भूमिका असल्याचे आ. संग्राम जगताप यांनी सांगितले. नगर शहरातील समस्त व्यापारी बांधवांच्या वतीने आ. संग्राम जगताप यांना जाहिर पाठींबा देण्यात आला. त्यावेळी उपस्थित व्यापार्यांशी आ. जगताप यांनी संवाद साधला.**

अहिल्यानगर शहरातील पन्नासहून अधिक विविध व्यापा-यांच्या संघटनांनी महायुतीचे उमेदवार आ. संग्राम जगताप यांना पाठींबा जाहिर केला. त्यानिमित्त व्यापारी संघटनांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सर्व संघटनांचे पदाधिकारी, व्यापारी, उद्योजक मोठया संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ. जगताप म्हणाले, दहा वर्षे आमदार म्हणून काम केल्याने सरकार दरबारी आपले चांगले वजन आहे. त्याचा उपयोग फातलू गोष्टींसाठी न करता मोठा विकास निधी मंजुर करून आणण्यासाठी आपण प्राधान्य देण्यासाठी केला आहे.

राज्याच्या नकाशावर विकसित नगर शहर म्हणून वेगळी ओळख निर्माण करून भविष्यात आपले शहर हे मेट्रोसिटी करण्याचा संकल्प आहे. त्यासाठी तुम्हा सर्वांची मला साथ हवी आहे. अहिल्यानगर शहरातील तब्बल ५३ व्यापारी संघटनांनी मला पाठींबा दिल्याबद्दल मी सर्वांच्या ऋणात राहील असे आ. जगताप म्हणाले.

आ. जगताप पुढे म्हणाले, नगर शहर बदलत असल्यानेच शहरीकरण, व्यापार, उद्योग क्षेत्राला चालना देण्यासाठी गेल्या दहा वर्षांपासून शहर विकासाचे नियोजन करत आहे. औद्योगिक क्षेत्र वाढून रोजगार वाढावा यासाठी विळदमध्ये ६०० एकर क्षेत्रात नव्या एमआयडीसीसाठी जागा मंजुर झाली आहे. हे नगर विकासाचे महत्वाचे पाऊल आपण टाकत आहोत. पुढील १५ ते २० वर्षांचा विचार करून शहरातील सर्व डीपी रस्त्यांचे दर्जेदार कामे सुरू असल्याचे जगताप म्हणाले.

यावेळी मा. आ. अरूण जगताप, उद्योजक नरेंद्र फिरोदिया, संतोष बोथरा, डाळ मंडई आडते बाजार मर्चंट असोसिएशनचे अध्यक्ष अशोक गांधी, सराफ संघटनेचे अध्यक्ष सुभाष कायगांवकर, इंडस्ट्रियल इस्टेटचे अध्यक्ष अरविंद गुंदेचा, जॉग्री असोसिएशनचे अध्यक्ष राजू बोथरा, मिरची मर्चंट असोसिएशनचे अध्यक्ष गोपाळ मणियार, आदर्श व्यापारी संघटनेचे संजय चोपडा, क्रीडाईचे अध्यक्ष अमित मुथा, भाजी, फळ, फुल व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष अशोक लाटे, उद्योजक व रामकृष्ण क्रेडिट सोसायटीचे चेअरमन श्रीगोपाल धुत, हॉटेल व्यवसायिक संघटनेचे अध्यक्ष प्रदीप पंजाबी, अण्णासाहेब मुनोत, अनिल पोखरणा, अमी संघटनेचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ, कापड बाजार असोसिएशनचे अध्यक्ष श्याम देडगांवकर, आदेश चंगेडीया, राजेश भंडारी, सिंधी समाजाचे अध्यक्ष महेश मध्यान, सुरेश हिरानंदानी, प्रकाश गांधी, सावेडी उपनगर व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष शिवाजीराव चव्हाण, अविनाश घुले, गणेश भोसले, प्रकाश भागानगरे, संतोष बोरा, जय रंगलानी, ठाकूर नवलानी, राजेंद्र चोपडा, पोपट भंडारी, अशोक भंडारी, डॉ. विजय भंडारी, भाजपा नेते सुवेंद्र गांधी आदी उपस्थित होते.

जयद्रथ खाकाळ यांनी आ. जगताप यांनी एमआयडीसमध्ये उपलब्ध करून दिलेल्या सुविधांची माहीती दिली. संतोष बोथरा यांनीही मनोगत व्यक्त केले. संतोष बोथरा यांनी स्वागत, कमलेश भंडारी यांनी सुत्रसंचलन तर विपुल शेटिया यांनी आभार मानले.

### शहर विकासाचा वेग वाढला

आ. संग्राम जगताप यांनी केलेल्या कामांमुळे शहराच्या विकासाचा वेग वाढला आहे. करोना संकट काळातही आ. जगताप यांनी केलेले मदत कार्य अतुलनिय आहे. असे उत्कृष्ट काम करणाऱ्या संग्राम जगताप यांना तिसऱ्यांदा निवडूण आणण्यासाठी आपण सर्वांनी एकदिलाने काम करावे.

उद्योजक

### आ. जगताप यांच्या विजयाची पावती

आ. संग्राम जगताप यांना पाठिंबा देण्यासाठी प्रथमच इतक्या मोठया संख्येने व्यापारी एकवटला आहे. सर्वजण एकवटले ही त्यांच्या विजयाची पावतीच आहे. जगताप परिवार नम्रपणे व्यापार्यांच्या पाठीशी उभा असून आ. जगताप यांचा विजय निश्चित आहे.

श्रीगोपाल धुत
उद्योजक

# रिपब्लिकन पार्टीचा राणी लंके यांना पाठिंबा

## राष्ट्रीय सरचिटणीस रा.सु.गवई यांचे पत्र



पारनेर : प्रतिनिधी

**रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी नीलेश लंके यांना पाठिंबा जाहिर करण्यात आला. पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस रा.सु.गवई यांनी तसे पत्र खा. नीलेश लंके यांच्याकडे पाठविले आहे.**

पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष बन्सी सिताराम घंगाळे यांनी खा. नीलेश लंके यांची भेट घेत त्यांच्याकडे पाठिंब्याचे पत्र सुपूर्द केले. विधानसभा निवडणूकीमध्ये रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया व महाविकास आघाडीतील घटक पक्ष यांची युती झालल असून रिपब्लिकन पाट ऑफ इंडिया तसेच लहुजी वस्ताद संघटना, एकलव्य संघटना व रिपब्लिकन पार्टीचे सर्व गट यांनी महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके यांच्या प्रचारात सक्रिय होणार आहेत.

राज्यातील महायुती सरकारच्या काळात वाढती महागाई, भ्रष्टाचार, बेरोजगारी वाढलेली आहे. शेतकऱ्यांचे, विद्यार्थ्यांचे प्रश्न, मागासवर्गीय जनतेवर होणारे अन्याय आदी प्रश्नही ज्वलंत आहेत. हे प्रश्न दुर करण्यासाठी महाविकास आघाडी हाच पर्याय असून आम्ही सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके यांच्या प्रचारात सक्रीय होऊन त्यांना जास्तीत जास्त मतदान घडवून आणण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहोत असे बन्सी घंगाळे यांनी सांगितले.

# काशिनाथ दाते यांना साथ द्या

## हास्यसम्राट फेम भाऊ कदम यांचे आवाहन



पारनेर : प्रतिनिधी

**काशिनाथ दाते यांच्या रूपाने राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी महायुतीचे सुसंस्कृत उमेदवार दिले असून पारनेर-नगर मतदारसंघातील मतदारांनी त्यांना साथ देण्याचे आवाहन हास्यसम्राट फेम अभिनेते भाऊ कदम यांनी केले.**

काशिनाथ दाते यांच्या प्रचारार्थ पारनेर शहर, सुपा तसेच इतर गावांमध्ये कदम तसेच उमेदवार काशिनाथ दाते यांच्या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीदरम्यान भाऊ कदम यांनी नागरीकांशी संवाद साधला. यावेळी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, विश्वनाथ कोरडे, संध्या सोनवणे, प्रशांत गायकवाड,विक्रम कळमकर,राहुल शिंदे, सागर मैड, सुनील थोरात, दत्ता पवार, युवराज पठारे, किरण कोकाटे,अश्विनी थोरात, वसंत चेडे,अशोक चेडे, ॲड. युवराज पाटील यांच्यासह महायुतीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षा संध्या सोनवणे म्हणाल्या, गेली ४० वर्षे काशिनाथ दाते हे समाजकारणात, राजकारणात आहेत. त्या माध्यमातून त्यांनी सर्वसामान्य नागरीकांसाठी मोठे योगदान दिले आहे. या निवडणूकीत त्यांनी दिलेल्या योगदानाची दखल घेऊन मतदार त्यांच्या पारडयात मतांचे दान भरभरून टाकणार आहेत. लाडकी बहिण योजनेची कॉपी करण्याच्या नादात लाडकी बायको योजना पारनेरमध्ये सुरू करण्यात आली असून फकीराचा आव आणून भुलथापा दिल्या जात असल्याची टीका सोनवणे यांनी केली.

उमेदवार काशिनाथ दाते म्हणाले, महायुतीच्या कार्यकर्त्यांसोबत इतर कार्यकर्त्यांनीही आपणास साथ दिली असून साथ देणारांना मी वाऱ्यावर सोडणार नाही. प्रत्येकाची जाण ठेवणारा मी माणूस आहे. महायुतीचे सरकार हे महिला,शेतकरी व कष्टकरी जनतेच्या हिताचे आहे. मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेसह महिला, शेतकरी तसेच बेरोजगार तरूणांसाठी सुरू करण्यात आलेल्या विविध योजना राज्यात सुरू ठेवायच्या असतील तर महायुती सरकार पुन्हा सत्तेत आले पाहिजे. मी मोठया मताधिक्क्याने विजयी होणारच आहे. विधिमंडळात गेल्यानंतर मी सातत्याने तुमच्या पाठशी असेल अशी ग्वाही दाते यांनी यावेळी दिली. सागर मैड यांनी प्रास्ताविक तर दत्ता पवार यांनी आभार मानले.

### प्रत्येक गावासाठी निधी

जिल्हा परिषदेच्या बांधकाम समितीचा सभापती म्हणून काम करताना केवळ माझा जिल्हा परिषद गट नव्हे तर पारनेर-नगर मतदारसंघातील प्रत्येक गावासाठी निधी उपलब्ध करून विकास कामे मार्गी लावली आहेत.

काशिनाथ दाते, महायुतीचे उमेदवार

### खेदाची बाब

लोकसभा निवडणूकीच्या काळात घराणेशाहीचा आरोप करणाऱ्या विरोधकांनी स्वतःच्या घरात पत्नीला उमेदवारी दिली आहे. मतदारसंघातील साडेतीन लाख मतदारांसाठी ही खेदाची बाब आहे. महाविकास आघाडीच्या उमेदवार सुपे जिल्हा परिषदेच्या गटात सदस्या होत्या, मात्र गटातील शाळा खोल्या व पाणी योजनांची अवस्था अतिशय वाईट आहे.

राहुल शिंदे, भाजपा तालुकाध्यक्ष

# परीट समाजाचा आ.संग्राम जगताप यांना पाठिंबा

## आ. जगताप यांना मताधिक्य देण्याचा निर्धार



नगर : प्रतिनिधी

**श्री संत गाडगे महाराज मराठा परीट समाजाच्या वतीने अहिल्यानगर शहर विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांना पाठिंबा जाहिर करण्यात आला.**

संत गाडगे महाराज यांनी गावोगावी जात किर्तनाच्या माध्यमातून समाजाला स्वच्छतेचा संदेश दिला. आजही आपण स्वच्छतेवर काम करत आहोत. संत गाडगे महाराज यांनी स्वतः हाता झाडू घेउन स्वच्छता करत होते.आजही त्यांचे विचार समाजासाठी प्रेरणादायी व उर्जा देणारी आहे. आपण सर्वजण त्यांच्या विचाराने काम करू. विधानसभा निवडणूकीमध्ये श्री संत गाडगे महाराज मराठा परिट समाजाच्या वतीने पाठिंबा जाहिर केल्याबद्दल मी ऋणी असल्याचे यावेळी बोलताना आ. संग्राम जगताप यांनी सांगितले.

श्री संत गाडगे महाराज परीट समाजाच्या वतीने विधानसभेला संग्राम जगताप यांना दिलेल्या पाठींब्याचे पत्र सुपूर्द करण्यात आले. यावेळी मनपा स्थायी समितीचे मा. सभापती सचिन जाधव, नंदकिशोर रोकडे, मनोज शिरसाठ, शंकर सोनवणे, विवेक गायकवाड, सुधाकर पवार, अशोक साळुंखे,अशोक ससाणे यांच्यासह समाज बांधव उपस्थित होते.

### संग्राम जगताप यांचे अहोरात्र काम

आ. संग्राम जगताप निवडणूक संपल्यानंतर पाच वर्षे शहराच्या विकासासाठी व समाजातील प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी अहोरात्र काम करत असतात. त्यांच्या विजयासाठी आपण खारीचा वाटा उचलावा यासाठी श्री संत गाडगे महाराज मराठा परीट समाजाच्या वतीने बिनशर्त पाठिंबा देण्यात आला आहे.

नंदकिशोर रोकडे

# संग्राम जगतापांच्या प्रचारासाठी एकवटल्या लाडक्या बहिणी !

## विश्वास जुना, संग्रामभैय्या पुन्हाची घोषणाबाजी



नगर : प्रतिनिधी

**महायुतीचे उमेदवार आ. संग्राम जगताप यांच्या प्रचारार्थ विविध क्षेत्रातील महिला एकवटल्या असून विश्वास जुना, संग्रामभैय्या पुन्हा अशी घोषणाबाजी करीत विविध प्रभागांतील मतदारांना संग्राम जगताप यांना मतदान करण्यासाठी साकडे घालण्यात आले.**

आ. जगताप यांच्या भगिनी डॉ. वंदना फाटके, मा. नगरसेवक सुभाष लोंढे यांच्या पत्नी माधुरी लोंढे,अरूणा गोयल, आशा निंबाळकर, प्रिया जानवे, शितल लोंढे यांच्यासह महिलांनी शहरातील विविध प्रभागांमध्ये जात मतदारांच्या गाठी-भेटी घेतल्या. या प्रचार फेरी मोठया संख्येने महिला पदाधिकारी व नागरीक सहभागी झाले होते. या प्रचार फेरीचे नेतृत्व डॉ. वंदना फाटके यांनी केले. त्यांच्यासह सहभागी महिलांनी नागरीकांच्या वयक्तिक भेटी घेत त्यांना प्रचार पत्रकांचे वाटप केले. आ. संग्राम जगताप यांनी गेल्या दहा वर्षात केलेल्या कामाची माहीती देत आ. जगताप यांना मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले.

मा.नगसेवक सुभाष लोंढे यांनी या प्रचार फेरीचे नियोजन केले. प्रचार फेरीत संभाजी लोंढे,किशोर डागवाले, दिनेश लोंढे, मनोज लोंढे, बाळासाहेब भुजबळ,आकाश दळवी, अभिजित भिंगारदिवे, उदय खरमाळे, राजू शिंदे, रोहन डागवाले, भाजपाच्या सरचिटणीस सरीता कोटा, सारिका दासरी, सुजाता कदम,संगीता पठारे, सुहास पाथरकर, अप्पासाहेब तारू, महेश लोंढे यांच्यासह अनेक महिला सहभागी झाल्या होत्या.

### लाडक्या बहिणींचे लाडके बंधू !

आ. संग्राम जगताप हे केवळ माझे बंधू नसून सर्व लाडक्या बहिणींचे लाडके बंधू आहेत. त्यांच्या माध्यमातून शहरातील हजारो भगिनींना मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचा लाभ मिळाला आहे. गेल्या दहा वर्षात शहरातील सर्व प्रभागांतील जनतेला चांगल्या सुविधा मिळण्यासाठी विकास कामांच्या माध्यमातून स्थानिक प्रश्न मार्गी लावले आहेत. या निवडणूकीमध्ये महिला भगिनींसह सर्व जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून आ. संग्राम जगताप यांचा विजय निश्चित आहे.

डॉ. वंदना फाटके

### महायुती सरकारचे पाठबळ

राज्यातील महायुती सरकारने कमी काळात महिलांसाठी खूप काही केले आहे. एस टी बसमध्ये ५० टक्के सवलत, लाडकी बहिण योजनेतून महिलांना आर्थिक पाठबळ देत न्याय दिला आहे. शहराचे आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून महिलांना या योजनांचा लाभ मिळत असून ते नागरीकांसाठी सतत उपलब्ध असतात.

माधुरी लोंढे

# शहर विकासासाठी सामर्थ्य दे!

## ■ आ. संग्राम जगताप यांचे रेणूकामातेला साकडे ■ केडगांवमधील प्रभाग १७ मधील प्रचार फेरीस प्रतिसाद



केडगांव : प्रतिनिधी

**विधानसभेचा सदस्य म्हणून गेल्या दहा वर्षात विकास कामांच्या माध्यमातून नगरककांनी सेवा केली असून अशीच सेवा भविष्यातही घडावी यासाठी शहर विकासाठी सामर्थ्य दे असे साकडे आमदार संग्राम जगताप यांनी केडगांवच्या कुलस्वामिनी रेणुकामातेला घातले.**

विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीमध्ये नगर शहर मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार आ. संग्राम जगताप यांनी केडगांवमध्ये रेणुकामाता मंदिरात दर्शन घेउन प्रभाग १७ मध्ये प्रचार फेरी काढून मतदारांशी संवाद साधला.

यावेळी बोलताना आ. जगताप म्हणाले, शहर व केडगांव उपनगरातील नागरिकांचे प्रश्न सोडविण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न केले. विकास कामांच्या माध्यमातून सुविधा उपलब्ध करून दिल्या. त्यामुळे आज प्रचार फेरीरदम्यान नागरीकांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधान दिसत आहे. त्यांच्या चेहऱ्यावरील आनंदाने मी केलेल्या कामाचे चिज झाल्याचे समाधान मला आज केडगांवकरांनी दिले आहे. यापुढील काळातही अशीच सेवा करण्याची संधी मिळावी अशी अशी प्रार्थना आ. जगताप यांनी रेणुकामातेचरणी केली. प्रचारफेरीदरम्यान ग्रामस्थांनी ठिकठिकाणी आ. कोतकर यांचे उत्स्फुर्तपणे स्वागत केले.

यावेळी माजी नगरसेवक मनोज कोतकर, सुनील कोतकर, जालिंदर कोतकर, पोपट कराळे, संजय लोंढे, मनोज कराळे, राजेश भालेराव, महेश गुंड,संभाजी सातपुते, साहेबराव विधाते, धनंजय जामगांवकर, पंकज जहागीरदार, राजेंद्र सातपुते, गणेश नन्नवरे, राहुल कांबळे, सुरज कोतकर आदींसह महायुतीचे पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते.

या परिसरातील अमितनगर,ताराबाग कॉलनी, एकता कॉलनी, चिपाडे मळा भागातील प्रचारादरम्यान ठिकठिकाणी फटक्यांच्या आतिषबाजीत आ. जगताप यांचे स्वागत केले. यावेळी रोहित कोतकर, सुमित लोंढे, सोन्याबापू वाघमारे, सुहास साळुंके, बच्चन कोतकर, वैभव कदम, विजय सुंबे, चंद्रकांत पाटोळे, पोपट कराळे, सुजय मोहिते, माऊली जाधव, जितू गायकवाड, सचिन माथाडे, कृष्णा लांडे, अतुल मकासरे, दीपा भंडारी, सौ. मनिषा बाविसकर, शितल नन्नवरे, लाटे काकू यांच्यासह नागरीक मोठया संख्येने उपस्थित होते. प्रचार फेरीत आशा निंबाळकर, अरूणा गोयल, सुजाता कदम, संगिता ससे, लता पठारे, मनोज नन्नवरे, अक्षय कांबळे, दत्ता खैरे, शरद ठुबे, सुमित लोंढे यांच्यासह नागरीक उपस्थित होते.

### नागरीक सुखाने नांदताहेत !

आ. संग्राम जगताप यांनी केडगांवचे मुलभुत प्रश्न सोडविण्याबरोबरच सर्व मुख्य रस्ते, अंतर्गत रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण, ड्रेनेज लाईन, पथदिवे, नियमित पाणीपुरवठा आदी प्रमुख कामे माग लावली आहेत. केडगांवमधील उद्याने, खेळाची मैदाने, मंदिरांचे सुशोभिकरण, युवकांच्या रोजगाराचा प्रश्न आ. संग्राम जगताप यांनी माध्यातून माग लागल्याने येथील नागरीक सुखाने नांदत आहेत.

जालिंदर कोतकर
मा. नगरसेवक

### आ.जगतापांशी जिव्हाळयाचे नाते

नागरीकांच्या संकट काळात आ. संग्राम जगताप हे २४ तास उपलब्ध असल्याने ते केडगांवच्या नागरीकांच्या गळयातील ताईत बनले आहेत. आ. जगताप यांच्याशी जिव्हाळयाचे नाते निर्माण झाल्याने विधानसभेच्या निवडणूकीत केडगांव ग्रामस्थ मोठया संख्येने संग्राम जगताप यांच्या पाठीशी उभे राहून त्यांना मतदानरूपी आशीर्वाद देत बहुमताने विजयी करतील यात शंका नाही असा विश्वास मा. नगरसेवक जालिंदर कोतकर यांनी व्यक्त केला.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com